# Newspaper: Maharashtra Times
# Article date: 3rd July, 2023

## Article about ‘Beach Clean Up Drive at Mahim Causeway Beach & Food donation drive at St.Michael’s Church by Team Enigma’

# सामाजिक उपक्रमाने एनिग्माचा आरंभ

**प्रथमेश दोंड,** स्टर्लिंग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज.

अनेक कॉलेजांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षातील फेस्टिव्हल्सची चाहूल लागायला सुरुवात झाली आहे. अभ्यासासह फेस्टिव्हल आणि त्या निमित्तानं आयोजित केले जाणारे कार्यक्रम म्हणजे कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी पर्वणी असते. माटुंगा येथील **पोदार कॉलेज**चा एनिग्मादेखील लक्षवेधी फेस्टिव्हल्सपैकी एक मानला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही एनिग्मा फेस्टिव्हलची सुरुवात 'बीच क्लीन अप'या सामाजिक उपक्रमानं करण्यात आली. हा उपक्रम बीच प्लीज संस्थेचे मल्हार कळंबे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीनं पार पडला.



माहीम कॉझवे येथे पार पडलेल्या मिठी नदी किनारा स्वच्छता मोहिमेत

१००हून अधिक जणांनी सहभाग नोंदवला. यात पोदार कॉलेजचे विद्यार्थी, बीच प्लीज संस्थेचे सदस्य आणि संस्थेशी संलग्न इतर सदस्यांचाही समावेश होता. या उपक्रमाच्या निमित्तानं प्लास्टिक आणि इतर कचरा जमा करत समुद्रकिनाऱ्यांसह पर्यावरणाचं महत्त्व पटवून देण्यात आलं. मॅनेजमेंट टीमचा सदस्य अनिष अंबावने सांगतो, 'समुद्रकिनारा स्वच्छ करताना जाणवलं की, आपण विल्हेवाट न लावता येण्याजोग्या कचऱ्याची निर्मिती करतो. म्हणूनच पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करणं काळाची गरज आहे'. तसंच स्वच्छता मोहिमेनंतर टीम एनिग्मातर्फे सेंट मायकल चर्च जवळील गरजूंना अन्नदान करण्यात आलं.



**पोदार कॉलेजसह सामाजिक उपक्रम राबवण्याचं हे तिसरं वर्ष आहे. मुंबईतील वाढता पावसाचा जोर पाहता उपक्रमाला किती प्रतिसाद मिळेल, अशी शंका होती. पण जोरदार पाऊस असतानाही उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला हे चित्र सुखावणारं होतं.**

- मल्हार कळंबे, संस्थापक, बीच प्लीज संस्था

**दरवर्षी जून महिन्यात कॉलेजमध्ये नवीन विद्यार्थी दाखल होतात, त्या प्रत्येकाला फेस्टिव्हलच्या निमित्तानं एक जबाबदार नागरिक म्हणून सामाजिक बांधिलकी जपण्याचे विचार रुजावे, या भावनेतून दरवर्षी एनिग्माची सुरुवात सामाजिक उपक्रमातून केली जाते.**

- श्रुती तांबे, सचिव, एनिग्मा-२०२३